महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १५८/प्रनिप्रा/3113 दिनांक : 08 AUG 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, **दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ६६व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. रावसाहेब भागडे (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, ६) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. एम.बी. निकम, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा परीक्षा समन्वयक, कृषी शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, २) वैद्य एन.आर. साबु, प्राध्यापक हे संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या वतीने ३) श्री. सिध्देश नर, परिक्षा समन्वयक, वैद्यकीय/आयुष, शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व ४) श्री. जे. पी. दाते प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | २९/०७/२०२२ | दुपारी १२:०० वा. | आयुष शिक्षण | पदवी व्यावसायिक आयुष शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रस्ताव |
| | | दुपारी ०३:०० वा. | | पदव्युत्तर व्यावसायिक आयुष शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रस्ताव |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आयुष शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाची क्रमांक ६६वी बैठक दिनांक २९/०७/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली.

संचालनालय, आयुष शिक्षण विभाग, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आयुष शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे बैठकीमध्ये अवलोकन करण्यात आले, तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) प्रक्रिया शुल्काच्या संदर्भात शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असे संदर्भाधीन पत्राने कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **फक्त शासकीय** (राज्य शासनाची) महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये/संस्थांकडून प्रक्रिया शुल्क प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ६(अ) नुसार वसूल करण्यात यावे.

२) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(ड) मधील निर्णयास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी/पदव्युत्तर आयुष शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित व्यावसायिक संस्थांच्या १ टक्के प्रस्तावातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची प्रत्यक्ष छाननी/पडताळणी करण्यात आली तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आयुष शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense, ४) MKB व ५) Orphan या संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात आली व तद्नुषंगाने या संदर्भात सादर केलेल्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

३) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालनालय, आयुष शिक्षण विभाग, मुंबई यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या तपासणी/पडताळणी अहवालांचा गोषवारा खालील प्रमाणे,-

**अभ्यासक्रम : आयुष शिक्षण विभाग**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | शासकी महाविद्यालयांचा तपशील (प्रपत्र-अ) | | अमान्य प्रवेश (प्रपत्र-ब) | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-क) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालये | प्रवेशित विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेली विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १) | PG-Ayurved | ०४ | १४४ | १४ | २७९ | १८ | ०० | ०१ | ६४६ |
| २) | PG-Homoeopathy | ०० | ०० | ०८ | १४९ | ०८ | २५ | ०० | ११५ |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | अभ्यासक्रम | शासकी महाविद्यालयांचा तपशील (प्रपत्र-अ) | | अमान्य प्रवेश (प्रपत्र-ब) | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-क) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालये | प्रवेशित विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेली विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| ३) | PG-Unani | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ११ |
| ४) | BAMS | ०५ | ५६३ | ४३ | २८५३ | ३२ | ०० | ०० | २४४६ |
| ५) | BHMS | ०० | ०० | २७ | २१४१ | २५ | ४७ | ०३ | १९८३ |
| ६)) | BUMS | ०० | ०० | ०३ | १८० | ०४ | ०१ | ०० | २२८ |
| | Total : | ०९ | ७०७ | ९५ | ५६०२ | ८८ | ७३ | ०४ | ५४२९ |

उक्त तालिकेतील अभ्यासक्रम व महाविद्यालय निहाय तपशीलवार माहिती <u>प्रपत्र - 'अ', 'ब' व 'क'</u> मध्ये सोबत जोडलेली आहे. तालिकेतील दर्शविलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत,-

१) उक्त तालिकेतील स्तंभ क्रमांक ३ मध्ये दर्शविलेली महाविद्यालये <u>(प्रपत्र-अ)</u> शासकीय महाविद्यालयांच्या संदर्भात शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असे संदर्भाधीन पत्राने कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **<u>फक्त शासकीय</u>** (राज्य शासनाची) महाविद्यालयातील प्रवेशांना मान्यता देण्याची आवश्यकता नाही.

२) उक्त स्तंभ क्रमांक (५) मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार रितसर प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास सादर न केल्यामुळे सदरील महाविद्यालयांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत नाही. **<u>(प्रपत्र- 'ब').</u>**

३) स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांची अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या तपासणी/छाननी प्रक्रियेमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत.

प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, अशा महाविद्यालयांना **(प्रपत्र- 'क' नुसार)** प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२०-२१ नुसार ईमेल व स्पीडपोस्ट द्वारे संबंधीतांना अवगत करावे) कार्यवाही करावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेश मान्यते प्रकरणी दंडात्मक कारवाई रद्द करणेबाबत.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५, १६ व १७ जुन, २०२२ रोजींच्या बैठकीत महाविद्यालयांनी विहीत केलेल्या कालावधीमध्ये प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर न केल्यामुळे अशा महाविद्यालयांना प्रत्येकी रु.१ लाख दंड आकारण्यात आलेला होता. यासंदर्भात काही महाविद्यालयांकडून प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यास जाणिव पुर्वक विलंब न झाल्याची निवेदने प्राधिकरणांस सादर केलेली आहेत. संबंधीत संचालकांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव तपासणी करुन प्राप्त झाल्यानंतर त्वरीत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे असे प्रस्ताव सादर केल्याचे महाविद्यालयांनी त्यांच्या निवेदनामध्ये सादर केलेले आहे. अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतुदींनुसार या महाविद्यालयांनी जाणिव पुर्वक दिरंगाई केल्याचे दिसून येत नाही सबब, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५, १६ व १७ जुन, २०२२ रोजींच्या बैठकीत महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाखाची दंडात्मक कारवाई रद्द करण्यात येत आहे.

प्राधिकरण पुढे असे आदेश देत आहे की, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. १५, १६ व १७ जुन, २०२२ रोजींच्या बैठकीतील प्रपत्र अ नुसार मान्यता दिलेल्या प्रवेशांना विहीत पद्धतीनुसार प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करावी.

(ख) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/कलाशिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत.

अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/कलाशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संबंधीत संचालनालयांनी प्रमाणित केलेले प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क भरणा करुन ज्या महाविद्यालयांनी प्राधिकरणांस मागील बैठकीनंतर सादर केलेले आहेत अशा प्रस्तावांबाबत अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदींनुसार पडताळणी करुन प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

अ) तंत्रशिक्षण विभाग

उक्त प्रकरणी प्रवेश नियमाक प्राधिकरणाची मान्यता प्रदान केलेल्या प्रवेशांचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मागील बैठकीत निर्णय घेतलेल्या महाविद्यालयांची एकुण संस्था | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ड) | | | | प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थांची संख्या (प्रपत्र-इ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | विद्यार्थी | संस्था | त्रुटी असलेले विद्यार्थी संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेले विद्यार्थी | |
| १) | पदवी अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | २८३ | ७९७९१ | ८ | १० | ० | १०३३ | २४ |
| २) | पदवी औषधनिर्माणशास्त्र | २९४ | २४९३२ | १२ | ३ | ० | १२२३ | ४७ |
| ३) | थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी | २८३ | ५४६५१ | ९ | ४ | ० | १२९३ | २४ |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मागील बैठकीत निर्णय घेतलेल्या महाविद्यालयांची एकुण संस्था | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ड) | | | | प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थांची संख्या (प्रपत्र-इ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | विद्यार्थी | संस्था | त्रुटी असलेले विद्यार्थी संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेले विद्यार्थी | |
| ४) | थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र | २५६ | ४६६९ | १२ | ० | ० | २१६ | ४३ |
| ५) | MBA/MMS | २७२ | ३१८०३ | १९ | १५३ | ३ | १६३१ | २७ |
| ६) | MCA | ७८ | ७०३९ | ६ | ६ | १ | ४४० | १४ |
| ७) | B. Architecture | ६० | २४५६ | २ | ० | ० | १०३ | ०५ |
| ८) | B.HMCT | ७ | ४०८ | ० | ० | ० | ० | ०१ |
| ९) | M. Engineering / M.Tech. | १५८ | ३०४७ | ३ | ० | ० | १६ | १२ |
| १०) | M. Pharmacy | १०३ | ३३२५ | ५ | ० | ० | १२२ | ०७ |
| ११) | M. Architecture | १९ | ३१२ | ० | ० | ० | ० | ० |
| १२) | M. HMCT | १ | ७ | ० | ० | ० | ० | ० |
| १३) | Pharm D. | ० | ० | २ | ० | ० | ६३ | १२ |
| १४) | Pharm. D (PB) | ० | ० | ० | ० | ० | ० | ०३ |
| | एकुण : | १८१४ | २१२४४० | ७८ | १७६ | ४ | ६१४० | २१९ |

ब) <u>उच्चशिक्षण विभाग</u>

उक्त प्रकरणी प्रवेश नियमाक प्राधिकरणाची मान्यता प्रदान केलेल्या प्रवेशांचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मागील बैठकीत निर्णय घेतलेल्या महाविद्यालयांची एकुण संस्था | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ड) | | | | प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थांची संख्या (प्रपत्र-इ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | विद्यार्थी | संस्था | त्रुटी असलेले विद्यार्थी संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेले विद्यार्थी | |
| १) | B. Ed. | १६९ | १०६३१ | २१० | ६७ | १४ | १४२८४ | १०७ |
| २) | M. Ed. | २६ | ७२४ | १४ | ०३ | ०० | २८७ | १९ |
| ३) | BA/BSc. - B.Ed. (Integrated) | ६ | २८० | ०१ | ०४ | ०० | २४ | ०२ |
| ४) | B.Ed./M.Ed. (Integrated) | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | २७ | ०० |
| ५) | B.P.Ed. | १६ | १२८५ | १७ | २४ | ०० | १५२६ | २३ |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मागील बैठकीत निर्णय घेतलेल्या महाविद्यालयांची एकुण संस्था | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ड) | | | | प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थांची संख्या (प्रपत्र-इ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | विद्यार्थी | संस्था | त्रुटी असलेले विद्यार्थी संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेले विद्यार्थी | |
| ६) | M.P.Ed. | १५ | ४६९ | ०७ | ०१ | ०० | १७७ | ०९ |
| ७) | LLB-३ (Years) | ५१ | ६८१२ | ३६ | ०२ | ०१ | ३४६५ | ६० |
| ८) | LLB-५ (Years) | ४१ | २८५० | ३२ | ०४ | ०० | २२२५ | ५९ |
| | एकुण : | ३२४ | २३०५१ | ३१८ | १०५ | १६ | २२०१५ | २७९ |

क) अभ्यासक्रम : कला शिक्षण विभाग

उक्त प्रकरणी प्रवेश नियमाक प्राधिकरणाची मान्यता प्रदान केलेल्या प्रवेशांचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मागील बैठकीत निर्णय घेतलेल्या महाविद्यालयांची एकुण संस्था | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ड) | | | | प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थांची संख्या (प्रपत्र-इ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | विद्यार्थी | संस्था | त्रुटी असलेले विद्यार्थी संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेले विद्यार्थी | |
| १) | पदवी कला शिक्षण | ०७ | ४०२ | ०३ | ०० | ०० | २८२ | ०१ |
| | एकुण : | ०७ | ४०२ | ०३ | ०० | ०० | २८२ | ०१ |

(ग) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.११ एप्रिल २०२२ च्या बैठकीतील बाब क्र.१ मधील परिच्छेद क्र.५ (प्रपत्र - ई) व दि. १२ एप्रिल, २०२२ च्या बैठकीतील बाब क्र. १ मधील परिच्छेद क्र.६ (प्रपत्र - ड) मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या तपासणी अहवालात काही विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसाठी शिफारस केली नव्हती, परंतू त्रुटी दर्शविण्यात आली नाही व काही विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेसाठी शिफारस होती परंतू त्यांच्या नावासमोर प्रवेश रद्द असा शेरा होता असे सर्व प्रवेश १% प्रवेश पडताळणी समितीने पुन:श्च पडताळणी करुन त्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले होते, त्यानुसार उक्त प्रवेश पडताळणी समितीने सादर केलेल्या अहवालास प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने, प्राधिकरणाच्या दि.११ व १२ एप्रिल, २०२२ रोजीच्या बैठकीतील प्रपत्र क मधील महाविद्यालयांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(घ) **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील तंत्रशिक्षण अभ्यासक्रमातील विद्यापीठ संचलित व विद्यापीठ विभाग (University Managed & University Department) महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना मान्यता देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासनाच्या दि.२२/०१/२०२० रोजीच्या पत्रात विद्यापीठ संचलित व विद्यापीठ विभाग महाविद्यालयांचा प्रवेश मान्यतेबाबत उल्लेख केलेला नाही त्यामुळे विद्यापीठ संचलित व विद्यापीठ विभाग महाविद्यालयांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता घेणे क्रमप्राप्त असल्याचे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.११/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत निर्देश देण्यात आलेले आहे. याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२७/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत महाविद्यालयांना अवगत करण्यात आले होते. त्यानुसार विद्यापीठ संचलित व विद्यापीठ विभाग महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या तपासणी अहवाल व प्राधिकरणाच्या प्रक्रिया शुल्कासह सादर केले आहेत अशा प्रस्तावांना संचालनालयाच्या तपासणी अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी नाहित अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. **(प्रपत्र - ई )** मान्यता दिलेल्या प्रवेशांना विहीत पद्धतीनुसार महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करावी.

(ङ) **महाविद्यालये/विद्यार्थी यांनी प्रवेश मान्यतेबाबत सादर केलेल्या पुन:र्विलोकन याचिकांमध्ये अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी दिलेल्या निर्णयांबाबत संबंधीत याचिकाकर्त्यांकडून सादर झालेल्या निवेदनांबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २ (झ) मधील निर्णयानुसार व तद्नुषंगाने प्राधिकरणाच्या दि.१/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार हितसंबंधीत (महाविद्यालये/विद्यार्थी) घटकांनी सादर केलेल्या पुन:र्विलोकन याचिकांबाबत मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सुनावणी घेऊन संबंधीतांना सुनावणीचे निर्णय निर्गमित करण्यात आले. सदर निर्णयाबाबत ब-याच महाविद्यालयांकडून पुन:र्विलोकन याचिकेतील विनंतीचा पुन:र्विचार करण्याबाबत निवेदने सादर केलेली आहेत **(प्रपत्र - उ)**. सादर करण्यात आलेली निवेदने व तसेच उक्त प्रकरणी सादर करण्यात येणा-या निवेदनांप्रकरणी अधिनियम २०१५ मधील तरतुदीं, प्रवेश नियम, मा. न्यायालयांचे निर्णयानुसार अशा निवेदनांबाबत उक्त प्रकरणी महाविद्यालयांनी सादर केलेली कागदपत्रे तपासून आवश्यक त्या शिफारशीसह सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर प्रकरणनिहाय अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावा.

(च) **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षांतर्फे राबविण्यात येणा-या (वैद्यकीय, आयुष, तंत्र, कला, कृषि व उच्चशिक्षण) पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेकरीता सेवा पुरवठादार निश्चितीबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाच्या विविध विभागाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नेमण्यात आलेल्या सेवापुरवठादारांमार्फत केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली आहे. त्याअनुषंगाने, आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विविध अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया गतवर्षीच्या सेवापुरवठादारांमार्फत राबविण्यासाठी गतवर्षी प्रसिद्ध केलेल्या निविदा- RFP Proposal मधील मुद्दा क्र. ४.२ (C ) मधील

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

तरतुदीनुसार गतवर्षीच्या अटी/शर्ती व खालील तक्त्यात नमूद केलेल्या दरांनुसार केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत शिफारस केली.

| अ. क्र. | विभागाचे नाव | सेवा पुरवठादार | दर रु. (प्रति उमेदवार) |
|---|---|---|---|
| १) | तंत्रशिक्षण | मे. फोर पिलर्स प्रा. लि. | ३३०/- |
| | | मे. सिंथेसिस प्रा. लि. | |
| २) | उच्च शिक्षण | मे. तलिस्मा कार्पोरेशन | २६४/- |
| ३) | कृषिशिक्षण | मे. एस.एम.बी. सिस्टम | ३६०/- |
| ४) | वैद्यकीय व आयुष | मे. एस.एम.बी. सिस्टम | २४०/- |
| ५) | कलाशिक्षण | मे. एस.एम.बी. सिस्टम | ३००/- |

आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांनी शिफारसीमध्ये नमूद केलेल्या दरांस वरील सेवापुरवठादारांच्या नेमणुकीस प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाबाबत पुरवठादारासोबत सामज्यंस करार करुन त्याची प्रत मा. सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना माहितीसाठी पाठविण्यात यावी. याबाबत आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांनी पुढील कार्यवाही करावी.

छ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता संचालनालय, आयुष शिक्षण विभाग, मुंबई व प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : ९/८/२२